पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे ४११ ०१८
Website : www.pcmcindia.gov.in
Email :prashasan@pcmcindia.gov.in
सामान्य प्रशासन विभाग

जा.क्र.साप्रवि/९ /कावि/३७५ /२०२६ दिनांक :-१९/११/२०२६

विषय:- शिक्षण विभाग / माध्यमिक शिक्षण विभागाकडील नस्ती (प्रस्ताव) सामान्य प्रशासन विभागामार्फत सादर करणेबाबत.

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभाग / माध्यमिक शिक्षण विभागाचे कार्यालयीन कामकाजामध्ये सुसूत्रता, पारदर्शकता व प्रशासकीय शिस्त राहण्याच्या दृष्टीने विभागांकडील धोरणात्मक, आस्थापनाविषयक व प्रशासकीय मान्यतांचे प्रस्ताव योग्य त्या कार्यपद्धतीनुसार सादर होणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत शिक्षण विभाग / माध्यमिक शिक्षण विभागाकडील काही नस्ती (प्रस्ताव) थेट मा. आयुक्त/मा. अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे सादर केल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रशासकीय बाबींची छाननी होण्यास विलंब होतो व नस्तींचा पाठपुरावा ठेवणे कठीण होते.

यास्तव, सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, यापुढे शिक्षण विभाग / माध्यमिक शिक्षण विभागाकडील खालील बाबींशी संबंधित सर्व नस्ती सामान्य प्रशासन विभागामार्फतच (Proper Channel) सादर करण्यात याव्यात.

१. आस्थापना विषयक बाबी (नेमणुका, पदोन्नती, शिस्तभंग विषयक कार्यवाही इ.)
२. नवीन पदे निर्माण करणे किंवा कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ घेण्याबाबतचे प्रस्ताव.
३. धोरणात्मक निर्णय व प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव.

तरी, शिक्षण विभाग / माध्यमिक शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. यापुढे सामान्य प्रशासन विभागाच्या अभिप्रायाशिवाय थेट सादर केलेल्या नस्ती स्वीकारल्या जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विजय सूर्यवंशी)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत,
१. अतिरिक्त आयुक्त-३ पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
२. शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
२. माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.